नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १३५ Issue - 135 | वार - शनिवार दि. १० ऑक्टोबर २०२६ Blow- Saturday Date 10 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## आणखी १८ तालुक्यांत दुष्काळाच्या तीव्रतेची प्रत्यक्ष पडताळणी होणार

### प्रमुख पाच पिकांचे २० टक्के सर्वेक्षण; दुष्काळाच्या तीव्रतेचे वास्तव चित्र स्पष्ट होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे अधिक अचूक आणि वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी शासनाने आणखी १८ तालुक्यांमध्ये दुष्काळाच्या तीव्रतेची प्रत्यक्ष पडताळणी (ग्राऊंड ट्रुथिंग) करण्यास मान्यता दिली आहे. या तालुक्यांतील प्रमुख पाच पिकांचे २० टक्के सर्वेक्षण करण्यात येणार असून, उपग्रह छायाचित्रे व संगणकीय माहितीची प्रत्यक्ष क्षेत्रीय परिस्थितीशी पडताळणी केली जाणार आहे. यामुळे दुष्काळाच्या तीव्रतेचे वास्तव चित्र स्पष्ट होण्यास मदत होणार आहे.



मंत्रिमंडळ उपसमितीच्या २९ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशांनुसार जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीतील पर्जन्याची तूट आणि अन्य घटकांचा विचार करून आणखी १८ तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मदत व पुनर्वसन विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने दुष्काळी परिस्थितीचे अचूक मूल्यमापन करून शेतकऱ्यांना आवश्यक मदत व सवलती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. खरीप हंगाम २०२६ मधील परिस्थितीच्या आधारे २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील २६५ तालुक्यांत ट्रिगर-१ निकषांनुसार दुष्काळ जाहीर करून विविध १२ उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

या १८ तालुक्यांमध्ये होणार पाहणी

नांदेड: मुदखेड, मुखेड, चंद्रपूर: जिवती, ब्रह्मपुरी, बल्लारपूर, गोंदिया: आमगाव, देवरी, सालेकसा, गोंदिया, वर्धा: कारंजा, भंडारा: मोहाडी, तुमसर, नाशिक: त्र्यंबकेश्वर, चांदवड, निफाड, सातारा: पाटण, सांगली: शिराळा, वाळवा.

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ मधील तरतुदींनुसार ही पडताळणी करण्यात येणार आहे. उपग्रह छायाचित्रे, नकाशे आणि संगणकीय माहितीच्या आधारे प्राप्त झालेल्या निष्कर्षांची प्रत्यक्ष क्षेत्रभेटीद्वारे खातरजमा केली जाणार आहे. प्रमुख पाच पिकांचे २० टक्के सर्वेक्षण केल्यामुळे पिकांची प्रत्यक्ष स्थिती आणि दुष्काळाच्या तीव्रतेचे मूल्यमापन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. या प्रक्रियेमुळे तांत्रिक माहिती आणि प्रत्यक्ष शेतातील परिस्थिती यांची सांगड घालून दुष्काळाचे अधिक अचूक चित्र समोर येईल. परिणामी, दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यासाठी शासनाला वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध होणार आहे.

## भारतीय वंशाच्या नावनेथम नावी पिल्लई यांना नोबेल शांतता पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली नोबेल शांताता २०२६ पुरस्कार कोणाला मिळणार? याची उत्सुकता गेल्या काही दिवसांपासून होती. कारण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प या पुरस्कारासाठी आग्रही होते. त्यामुळे या पुरस्काराच्या नावाची चर्चा रंगली होती. अखेर या नावाची घोषणा झाली आहे. भारतीय वंशाच्या नवनेथम नावी पिल्लई यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. २८७ उमेदवार आणि संघटनांच्या शर्यतीत त्यांच्या नावाची निवड झाली. स्पर्धकांची संख्या पाहता ही शर्यत काही सोपी नव्हती. त्यामुळे त्यांची निवड होण्याचं कारणंही तसंच असणार हे नक्की.. नावी पिल्लई या दक्षिण अफ्रिकेतील प्रख्यात कायदेतज्ज्ञ आहेत. वर्णभेदाच्या काळात कार्यकर्त्यांसाठी खटले लढण्यापासून ते आंतरराष्ट्रीय न्यायालयांमध्ये न्यायाधीश बनण्यापर्यंत आणि संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार प्रमुख होण्यापर्यंत त्यांनी कार्य केले आहे. आता त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली असून नोबेल शांतता पुरस्कारासाठी त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. १९६७ मध्ये पिल्लई या नेटालमध्ये वकिली सुरू करणाऱ्या पहिल्या कृष्णवर्णीय महिला ठरल्या. त्या काळात वर्णभेदाची मूळं खोल रुजली होती. त्यासाठी वर्णभेदी



सरकारकडून विरोध करणाऱ्या राजकीय संघटना आणि कार्यकर्त्यांचा छळ केला जात होता, त्यांना तुरूंगात टाकलं जात होतं. पण त्यांच्यासाठी पिल्लई उभ्या राहिल्या आणि कायदेशीर लढा दिला.

पिल्लई यांनी १९७३ मध्ये त्यांनी राजकीय कैद्यांना वकिलाला भेटण्याचा हक्क मिळवून दिला. १९७० च्या दशकाच्या मध्यात त्यांनी सेठ कूपर आणि स्ट्रिनी मूडली यांसारख्या कृष्णवर्णीय जाणीव चळवळीच्या सदस्यांचा बचाव केला. सामाजिक कार्यात व्यस्त असताना पिल्लई यांनी शिक्षण काही सोडलं नाही. १९८२ मध्ये हार्वर्ड विद्यापीठातून कायद्याची पदव्युत्तर पदवी आणि १९८८ मध्ये न्यायशास्त्राची डॉक्टरेट मिळवली. इतकंच काय तर नेटाल विद्यापीठात अध्यापन केलं. तसेच डर्बन वेस्टविल विद्यापीठ परिषदेच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिलं. १९९५ मध्य दक्षिण अफ्रिकेच्या उच्च न्यायालयाच्या प्रभारी न्यायाधीश झाल्या. त्याच वर्षी संयुक्त राष्ट्र महासभेने त्यांची आयसीटीआरच्या न्यायाधीश म्हणून निवड केली. तिथे त्यांनी आठ वर्षे सेवा दिली. १९९९ ते २००३ कालावधीत अध्यक्ष राहिल्या. सुरूवातीच्या चार वर्षात त्या न्यायाधिकरणातील एकमेव महिला न्यायाधीश होत्या. १ सप्टेंबर २००८ रोजी त्यांची संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्त म्हणून निवड झाली. नावी पिल्लई या मूळच्या तमिळ वंशाच्या भारतीय कुटुंबातील आहेत. त्यांचे आजी-आजोबा १८९० च्या दशकात भारतातून दक्षिण आफ्रिकेत स्थलांतरित झाले होते आणि ते ऊसाच्या मळ्यांमध्ये करारबद्ध मजूर म्हणून काम करत होते.

नोबेल शांतता पुरस्कार विजेत्याची घोषणा करताना नोबेल पुरस्कार समितीच्या एक्स हँडलवरून शेअर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, नावी पिल्लई या आपल्या काळातील आंतरराष्ट्रीय कायदेशीर तत्त्वांच्या सर्वात मोठ्या समर्थकांपैकी एक आहेत. त्यांची देदीप्यमान कारकीर्द आपल्याला जागतिक स्तरावर कायद्याच्या राज्याला पाठिंबा देण्याची, ते मजबूत करण्याची आणि त्याचा विस्तार करण्याची गरज अधोरेखित करते.

## ज्येष्ठ नाटककार, लेखिका आणि दिग्दर्शिका सई परांजपे यांना यंदाचा विष्णुदास भावे गौरव पदक पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : ज्येष्ठ नाटककार, लेखिका आणि दिग्दर्शिका सई परांजपे यांना यंदाचा विष्णुदास भावे गौरव पदक पुरस्कार जाहीर झाला आहे. नाट्य क्षेत्रातील मानाच्या पुरस्काराचे वितरण पाच नोव्हेंबर रोजी रंगभूमी दिनी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष मोहन जोशी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. गौरव पदक, ३० हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे अशी माहिती अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीचे अध्यक्ष डॉ. शरद कराळे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

सई परांजपे यांनी बालनाट्य, प्रौढ नाटके, नाट्यलेखन, दिग्दर्शन आणि अनुवाद अशा विविध क्षेत्रांत योगदान दिले आहे. वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा 'मुलांचा मेवा' हा पहिला ग्रंथ प्रकाशित झाला. आई शकुंतला परांजपे आणि आजोबा रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांच्या प्रोत्साहनातून त्यांच्या कलात्मक प्रवासाला दिशा मिळाली. परांजपे यांनी मुलांसाठी नऊ नाटके लिहिली. 'पक्ष्यांचे कवीसंमेलन', 'पत्ते नगरीत', 'झाली काय गंमत', 'जादूचा शंख' आणि 'शेपटीचा शाप' ही त्यांपैकी काही नाटके. 'झाली काय गंमत' आणि 'शेपटीचा शाप' या पुस्तकांना राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट पुस्तकांचे पुरस्कार मिळाले. त्यांची बालनाटके आजही शालेय स्तरावर सादर केली जातात. 'नांदा सौख्यभरे', 'सख्खे शेजारी', 'जास्वंदी', 'सोयरीक', 'माझा खेळ मांडू दे' आणि 'मोगरा फुलला' या नाटकांतून त्यांनी प्रौढ रंगभूमीवरही आपला ठसा उमटविला. 'जास्वंदी' या नाटकाला १९७८ मध्ये महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट नाट्यनिर्मितीचा पुरस्कार मिळाला.

## 'माशा मारण्यासाठी हातोड्याचा वापर करू नका..' सीजेपी आंदोलनापूर्वी देशव्यापी रेल्वेगाड्या, मेट्रो बंदीच्या फतव्यावर सुप्रीम कोर्टाची केंद्र सरकारला फटकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलनाबाबत कठोर भूमिका घेतल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारलं. सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, तुम्हाला काही गोष्टी थांबवाव्याच लागतात. त्या थांबवण्यासाठी जेवढी आवश्यक आहे तेवढीच कारवाई करा. पण याचा अर्थ असा नाही की माशी मारण्यासाठी हातोड्याचा वापर करावा. हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. सीजेपीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, आज रात्री ९ वाजल्यापासून ५७ मेट्रो स्थानके बंद राहणार आहेत. नवी दिल्ली आणि हजरत निजामुद्दीन स्थानकांवर येणाऱ्या सर्व मेल आणि एक्सप्रेस गाड्या उद्या रद्द करण्यात आल्या आहेत. रेल्वेने या गाड्या त्यांच्या मूळ स्थानकांवरूनच रद्द केल्या आहेत. दिल्ली पोलिसांच्या सह पोलीस आयुक्त नुपूर प्रसाद यांनी सांगितले की, दिल्लीतील सीजेपीच्या आंदोलनाला पोलिसांची परवानगी नाही.

मेट्रो सेवा पूर्णपणे थांबवता येणार नाहीत

सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला की, मेट्रो सेवा पूर्णपणे थांबवता येणार नाहीत. अधिकाऱ्यांनी मेट्रो आणि इतर गाड्यांची वाहतूक अशा प्रकारे नियंत्रित करण्याचा विचार केला पाहिजे, ज्यामुळे जनतेला गैरसोय होणार नाही. हा निर्णय कळवला पाहिजे आणि शहरात प्रवास करणाऱ्या लोकांना होणारा त्रास टाळण्यासाठी ही सूचना वर्तमानपत्रे आणि वेबसाइट्सवरही प्रसिद्ध केली पाहिजे.

केजरीवाल कुटुंबासह सीजेपीच्या आंदोलनात सहभागी होणार

आम आदमी पार्टीचे (आप) राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी शुक्रवारी घोषणा केली की, ते १० ऑक्टोबर रोजी दिल्लीतील जंतर मंतर येथे होणाऱ्या सीजेपीच्या आंदोलनात आपल्या कुटुंबासह सहभागी होतील. त्यांनी देशभरातील लोकांना मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले.

दुसरीकडे, रेल्वेच्या माहितीनुसार, नवी दिल्ली आणि हजरत निजामुद्दीन रेल्वे स्थानकांवर पहाटे चार ते दुपारी दोन या वेळेत येणाऱ्या मेल आणि एक्सप्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. दिल्ली पोलिसांनी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनला आज रात्री ९ वाजल्यापासून परिस्थिती सामान्य होईपर्यंत ५७ मेट्रो स्थानकांचे प्रवेश आणि निर्गमन दरवाजे बंद ठेवण्याचा प्रस्ताव पाठवला आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, या कालावधीत मेट्रो स्थानकांवरील इंटरचेंज सुविधा सुरू राहू शकतात. तथापि, स्थानकांचे प्रवेश आणि निर्गमन दरवाजे बंद करण्याबाबतचा अंतिम निर्णय ऊवठउ घेईल.

बिहारहून येणाऱ्या चार आणि उत्तर प्रदेशहून येणाऱ्या दहा रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

**अन्नधान्याचा काळाबाजार, अवैध साठेबाजी किंवा अन्य गैरव्यवहार होणार नाही, याची दक्षता घेण्याचे दिले निर्देश** — **शासन निर्णय निर्गमित**

## दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा सुरळीतपणे पुरवठा करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्र: राज्यातील जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत पर्जन्यमानातील तूट आणि अन्य घटकांमुळे प्रभावित झालेल्या दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांतील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा सुरळीतपणे उपलब्ध करून देण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य उपलब्ध करून देण्यासह, पात्रतेनुसार नवीन लाभार्थ्यांचा योजनेत समावेश, आधार संलग्नीकरण, स्थलांतरित लाभार्थ्यांना पोर्टेबिलिटी सुविधेचा लाभ आणि अन्नधान्य वितरणावर प्रभावी देखरेख ठेवण्याबाबत अन्न- नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने ९ ऑक्टोबर २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

मदत- पुनर्वसन विभागाच्या २५ सप्टेंबर २०२६ च्या शासन निर्णयानुसार, खरीप हंगाम २०२६ साठी राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळाची 'ट्रिगर-१' (प्रथम कळ) स्थिती लागू करून विविध सवलती आणि उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत. दुष्काळग्रस्त भागातील शेतीवर अवलंबून असलेले शेतकरी, शेतमजूर आणि अन्य प्रभावित घटकांना अन्नधान्याची टंचाई भासू नये, यासाठी प्रभावी व्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने शासनाने या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या लाभार्थी मर्यादेत पात्र लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य वितरित केले जाते.



दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमध्ये या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा नियमित, सुरळीत आणि विनाविलंब होण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत. शिवाय, पात्र लाभार्थ्यांना एपीएल डीबीटी योजनेचा लाभ नियमितपणे मिळेल, याची दक्षता घेण्यासही सांगण्यात आले आहे. दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमधील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या व्यक्तींनी मोफत अन्नधान्याची मागणी केल्यास, त्यांची शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार पात्रता तपासण्यात येणार आहे. संबंधित व्यक्तींचे उत्पन्न आणि योजनेसाठी उपलब्ध असलेली लाभार्थी मर्यादा विचारात घेऊन, पात्र व्यक्तींना अंत्योदय अन्न योजना किंवा प्राधान्य कुटुंब लाभार्थी गटात समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

यासाठी संबंधित कुटुंबाच्या शिधापत्रिकेवरील सर्व सदस्यांचे आधार संलग्नीकरण पूर्ण करून पात्र लाभार्थ्यांना तातडीने अन्नधान्य उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे निर्धारित निकष पूर्ण करणाऱ्या आणि योजनेत अद्याप समाविष्ट नसलेल्या व्यक्तींनाही योजनेचा लाभ मिळण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त भागात रोजगार किंवा पाण्याच्या शोधात शेतमजूर आणि नागरिकांना शहरी, निमशहरी अथवा जवळच्या अन्य भागांत स्थलांतर करावे लागू शकते. अशा परिस्थितीत स्थलांतरामुळे पात्र कुटुंबे त्यांच्या हक्काच्या अन्नधान्यापासून वंचित राहू नयेत, यासाठी 'वन नेशन, वन रेशन कार्ड' अंतर्गत पोर्टेबिलिटी सुविधेची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

**राज्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील पात्र लाभार्थ्यांची नोंदणी आधारावर आधारित ओळख पडताळणीसह ई-पॉस यंत्रणेद्वारे अन्नधान्य वितरणासाठी करण्यात येते. एईपीडीएस प्रणालीवर पात्र लाभार्थ्यांच्या नोंदी उपलब्ध असून, या प्रणालीच्या माध्यमातून पोर्टेबिलिटी सुविधा दिली जाते. त्यामुळे लाभार्थ्यांना त्यांच्या नेमून दिलेल्या रास्तभाव दुकानाव्यतिरिक्त इतर कोणत्याही सोयीच्या रास्तभाव दुकानातून अन्नधान्य घेता येते. दुष्काळामुळे स्थलांतर करावे लागणाऱ्या नागरिकांसाठी ही सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. स्थलांतरामुळे एकही पात्र कुटुंब किंवा लाभार्थी हक्काच्या अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही, याची वैयक्तिक दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.**

दुष्काळग्रस्त भागातील पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका उपलब्ध करून देताना 'मिशन सुधार' अंतर्गत संबंधित जिल्ह्यात रद्द झालेल्या शिधापत्रिकांचा इष्टांकही विचारात घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे उपलब्ध (पान २ वर...)

## संपादकीय....

### दुष्काळाची तीव्रता

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने दुष्काळी परिस्थितीचे अचूक मूल्यमापन करून शेतकऱ्यांना आवश्यक मदत व सवलती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. खरीप हंगाम २०२६ मधील परिस्थितीच्या आधारे २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील २६५ तालुक्यांत ट्रिगर-१ निकषांनुसार दुष्काळ जाहीर करून विविध १२ उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे अधिक अचूक आणि वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी शासनाने आणखी १८ तालुक्यांमध्ये दुष्काळाच्या तीव्रतेची प्रत्यक्ष पडताळणी (ग्राऊंड ट्रुथिंग) करण्यास मान्यता दिली आहे. या तालुक्यांतील प्रमुख पाच पिकांचे २० टक्के सर्वेक्षण करण्यात येणार असून, उपग्रह छायाचित्रे व संगणकीय माहितीची प्रत्यक्ष क्षेत्रीय परिस्थितीशी पडताळणी केली जाणार आहे. यामुळे दुष्काळाच्या तीव्रतेचे वास्तव चित्र स्पष्ट होण्यास मदत होणार आहे. मंत्रिमंडळ उपसमितीच्या २९ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशांनुसार जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीतील पर्जन्याची तूट आणि अन्य घटकांचा विचार करून आणखी १८ तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मदत व पुनर्वसन विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ मधील तरतुदींनुसार ही पडताळणी करण्यात येणार आहे. उपग्रह छायाचित्रे, नकाशे आणि संगणकीय माहितीच्या आधारे प्राप्त झालेल्या निष्कर्षांची प्रत्यक्ष क्षेत्रभेटीद्वारे खातरजमा केली जाणार आहे. प्रमुख पाच पिकांचे २० टक्के सर्वेक्षण केल्यामुळे पिकांची प्रत्यक्ष स्थिती आणि दुष्काळाच्या तीव्रतेचे मूल्यमापन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. या प्रक्रियेमुळे तांत्रिक माहिती आणि प्रत्यक्ष शेतातील परिस्थिती यांची सांगड घालून दुष्काळाचे अधिक अचूक चित्र समोर येईल. परिणामी, दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यासाठी शासनाला वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध होणार आहे.

# आपला आणि शिक्षक असणारा माणूस आमदार करायचा आहे : मानद सचिव सुधीर पटवर्धन

## ज्ञानयात्री डॉ. बी. पी. रोंगे सरांनी साधला पंढरपूर तालुक्यातील शिक्षकांशी संवाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- 'शिक्षणावर, संस्थेवर प्रेम करणारा माणूस आपल्याला भेटला आहे. जिथे अडचण तिथे मदत करणे हा ज्ञानयात्री डॉ. बी. पी. रोंगे सरांचा मूळ स्वभाव आहे. त्यांच्याकडून आपण त्यांचे हात धरून काम करून घेऊ.' असे मत पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव सुधीर पटवर्धन यांनी व्यक्त केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (स्वेरी) चे संस्थापक, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य तसेच स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बी.पी. रोंगे हे पुणे विभाग शिक्षक मतदान निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे विभागातील सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे व सोलापूर या पाचही जिल्ह्यांतील शिक्षकांशी मागील जवळपास दीड वर्षापासून संवाद साधत आहेत.

या संवादाच्या माध्यमातून ते शिक्षकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे प्रश्न शासन स्तरावर मांडण्यासाठी प्रयत्नशील आहेत. याच अनुषंगाने डॉ. रोंगे सर हे पंढरपूर शहर व तालुक्यातील शाळा महाविद्यालयातील शिक्षकांच्या भेटीच्या निमित्ताने संवाद साधत होते. या भेटींच्या निमित्ताने त्यांचे सर्वत्र जल्लोषाने स्वागत करण्यात येत होते.

पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या कवठेकर प्रशालेला भेट दिल्यावर मानद सचिव सुधीर पटवर्धन हे सरांच्या नियोजनबद्ध अभ्यासावर प्रकाश टाकत होते. मानद सचिव पटवर्धन पुढे म्हणाले की, 'डॉ. रोंगे सरांना दर महिन्याला शाळेत बोलावून प्रश्न मांडू, तो प्रश्न कधी सुटणार याचा त्यांच्या मार्गदर्शनाखाली तक्ता तयार करू. त्यातील किती प्रश्न सुटले? उर्वरित कधी? याचा ताळेबंध तयार करून प्रश्न कधी सुटणार याचे नियोजित पद्धतीने कार्य करून घेवू. अशा पद्धतीने आपण सरांसोबत काम करू. घरातला जवळचा माणूस म्हणून आपण त्यांना शिक्षक आमदार म्हणून विधानपरीषदेत पाठवू.

यासाठी आपण डॉ.बी. पी. रोंगे सरांना शिक्षक आमदार करण्यासाठी रुक्मिणी पांडुरंगाचरणी प्रार्थना करू.' असे सांगून पटवर्धन सरांनी डॉ. रोंगे सरांच्या कामाच्या पद्धतीची माहिती दिली.

यावेळी पंढरपूर तालुक्यातील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, पंढरपूर, कवठेकर प्रशाला पंढरपूर, अरिहंत पब्लिक स्कूल पंढरपूर, दत्त विद्यामंदिर सुस्ते, एस.के.एन. सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज कोर्टी, न्यू सातारा शिक्षण संकुल कोर्टी, न्यू इंग्लिश स्कूल भाळवणी, एसपी प्रोग्रेस पब्लिक स्कूल नांदोरे, ज्ञानदीप पब्लिक स्कूल नांदोरे, दौलतराव विद्यालय कासेगाव, विवेक वर्धिनी पंढरपूर, रेणुका विद्यालय बाभूळगाव, न्यू इंग्लिश स्कूल रोपळे, गगनगिरी विद्यालय सांगवी, किशोर निर्मळ पब्लिक स्कूल तारापूर, यशवंत विद्यालय पंढरपूर यांच्यासह इतर ११० पेक्षा जास्त शाळा, महाविद्यालयांना डॉ. बी.पी. रोंगे सरांनी भेटी देवून आपले विचार मांडले.

वास्तविक पाहता शैक्षणिक क्षेत्रातील यशस्वी उपक्रम पाहता पंढरपूर तालुक्यातील शिक्षकांनी डॉ. रोंगे सरांना विजयी करण्याचा विडा उचलला असल्याचे जाणवते. यावेळी 'शिस्त, नियोजन, परिश्रम व त्यातून मिळालेले यश' म्हणजे डॉ. बी. पी. रोंगे सर होय. शिक्षकांसाठी तळमळ असणारा व्यक्ती आपणांस आमदार म्हणून विधान परिषदेवर पाठवायचा आहे. अशी भावना मुख्याध्यापक पाटील यांनी व्यक्त केली.

यावेळी शाळेतील शिक्षकांनी समस्या व अडचणी व्यक्त केल्या. 'हे प्रश्न कसे सुटतील यासाठी मी कटिबद्ध आहे.' अशी ग्वाही ज्ञानयात्री डॉ. बी. पी. रोंगे सरांनी शिक्षकांना दिली.

## दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा सुरळीतपणे पुरवठा करा

(पान १ वरून...)

लाभार्थी मर्यादेच्या अनुषंगाने पात्र व्यक्तींना शिधापत्रिका देण्याची कार्यवाही करता येणार आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अन्नधान्याची उचल आणि वितरण निर्धारित मुदतीत पूर्ण होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी आगाऊ नियोजन करावे, असे शासन निर्णयात नमूद केले आहे. अन्नधान्य वितरण प्रक्रियेत कोणताही विलंब होऊ नये, तसेच योजनेंतर्गत वितरित होणाऱ्या अन्नधान्याचा काळाबाजार, अवैध साठेबाजी किंवा अन्य गैरव्यवहार होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, उपायुक्त (पुरवठा), जिल्हा पुरवठा अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी आणि तहसीलदार यांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. अन्न- नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने हा शासन निर्णय ९ ऑक्टोबर २०२६ रोजी निर्गमित केला असून, तो महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## पश्चिम बंगालच्या नंदीग्राम पोटनिवडणुकीत भाजपच्या हसिरानी रथ यांनी मिळवला विजय

**दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : पश्चिम बंगालमधील नंदीग्राम आणि रेजीनगर विधानसभा पोटनिवडणुकीच्या निकाल जाहीर झाला आहे. या दोन्ही मतदारसंघात भाजपने मोठा विजय मिळवला आहे. हसीरानी रथ यांनी पोटनिवडणुकीत प्रचंड मताधिक्याने विजय मिळवला आहे. हसीरानी रथ यांच्या विरोधात काँग्रेसचे उम्मेदवार मिलन प्रधान होते. रथ यांनी मोठ्या फरकाने त्यांचा पराभव केला. तर रेजिनगरमध्ये भाजपचे उमेदवार शंकरराव सरकार यांनी मोठा विजय मिळवला आहे. त्यांच्या विरोधात आम जनता उन्नयम पार्टीचे गुलाम नबी आझाद होते. तर ममता बॅनर्जींना तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे.

हसीरानी रथ यांना एकूण १,६४,४२७ मते मिळाली. तर त्यांच्या विरोधात काँग्रेसचे उमेदवार मिलन प्रधान होते. त्यांना ४१,६७४ मते मिळाली. रथ यांनी प्रधान यांचा १,२२,७५३ मतांच्या फरकाने पराभव केला. रथ या चंद्रनाथ रथ यांच्या मातोश्री आहेत. चंद्रनाथ रथ हे पश्चिम बंगालचे नेते सुवेंदू अधिकारी यांचे निकटवर्तीय होते. मात्र भाजपचा विधानसभा निवडणुकीतील विजय झाल्यांनतर काही दिवसांनीच मे महिन्यात त्यांची हत्या झाली होती.

शंकरराव सरकार यांनी रेजीनगरमधून पोटनिवडणूक लढवली. त्यांना एकूण १,२९,९१४ एवढे मते मिळाली. त्यांच्या विरोधात 'आम जनता उन्नयन पार्टी' च्या गुलाम नबी आझाद यांचा परभाव केला. गुलाम नबी आझाद यांना ५४,०९८ एवढे मते मिळाली होती. एकूण ७५,८१६ मतांच्या फरकाने शंकरराव सरकार यांनी विजय मिळवला.

### धुळीचा त्रास, खड्डे व वाहतूक कोंडीच्या समस्येकडे वेधले लक्ष

## वडपे-पडघा व पडघा-कल्याण रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत अण्णा बनसोडे यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुका ग्रामीणमधील वडपे ते पडघा टोलनाका, समृद्धी महामार्ग जंक्शन तसेच पडघा-कल्याण मार्गाची झालेली दुरवस्था, धुळीचा वाढता त्रास आणि सातत्याने निर्माण होणारी वाहतूक कोंडी या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी, भिवंडी तालुका ग्रामीणचे अध्यक्ष दिलशाद सिकंदर शेख यांनी महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष तथा पिंपरी-चिंचवडचे आमदार अण्णा बनसोडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

वडपे ते पडघा टोलनाका मार्गावर मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून, समृद्धी महामार्ग जंक्शन परिसरातील रस्त्याचे काम संथगतीने सुरू असल्याने नागरिकांसह दुचाकीस्वारांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून वाहनचालकांच्या सुरक्षिततेवरही परिणाम होत आहे.



दरम्यान, पडघा-कल्याण मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने या मार्गाची दुरवस्था झाली आहे. खड्ड्यांमुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे.

या तिन्ही मार्गांवर विशेषतः सायंकाळच्या वेळेत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने नागरिकांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, धुळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित पाणी फवारणीसह आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी संबंधित यंत्रणांनी प्रभावी नियोजन करावे, अशी मागणी दिलशाद शेख यांनी केली.

नागरिकांचा सुरक्षित प्रवास आणि आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता या समस्येवर तातडीने कार्यवाही करून संबंधित विभागांना आवश्यक आदेश द्यावेत, अशी विनंतीही यावेळी करण्यात आली.

या निवेदनाची दखल घेत अण्णा बनसोडे यांनी संबंधित यंत्रणांशी चर्चा करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल तसेच रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक आदेश देण्यात येतील, असे आश्वासन दिले.

# गरोदर माता व सुदृढ बालकांच्या मातांचा सत्कार; खामसवाडी येथे ९ वा राष्ट्रीय पोषण बीट स्तरीय कार्यक्रम उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे /खामसवाडी (प्रतिनिधी) : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे दि.८ ऑक्टोबर २०२६ रोजी रोकडेश्वरी मंदिरामध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजना व मोहा बीट अंतर्गत ९वा राष्ट्रीय पोषण माह बीट स्तरीय कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन पत्रकार शिवाजी बोबडे यांच्या हस्ते करून करण्यात आली.

यावेळी खामसवाडी सह बीट मधील ९ गावातील महिलांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमात सानिका पाटोळे या गरोदर मातेचे ओटीभरण करण्यात आले, तर साक्षी देवकर यांना गरोदर माता बेबी केअर किट देण्यात आले. तसेच अंगणवाडीच्या सेवानिवृत्त कार्यकर्त्या कमल गोरे, कालिंदा मंडाळे आणि अंगणवाडीमध्ये नवीन नियुक्त झालेल्या गीतांजली नागरगोजे, पूनम लोखंडे यांच्यासह सुदृढ बालकांच्या माता कल्पना किशोर शेळके, शिवकन्या रमेश शेळके, शिवानी प्रज्योत माने यांचा सत्कार करण्यात आला. तर सहा महिन्याच्या स्वामिनी राहुल बरगले या बालकास अन्नप्राशन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. राहुल आडसूळ, पत्रकार शिवाजी बोबडे, जगदंबा कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. मंदाकिनी सावंत, अंगणवाडी पर्यवेक्षिका अनिता थोरात, पर्यवेक्षिका सौ. आगलावे एस. पी. हे उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी कार्यकर्त्या व मदतनीस मंगल काळे, पूनम लोखंडे, अलका सुरवसे, सत्यभामा शेळके, मंदाकिनी सुरवसे, निर्मला जोशी, छानुबाई कोष्टी, वंदना भोसले, सुनिता कांबळे, मंजुश्री सुरवसे, छाया जाधव, गीतांजली नागरगोजे, शिवकन्या नागटीळक, आशा लोखंडे, धनश्री सुरवसे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास खामसवाडी येथील गरोदर माता, स्तनदा माता, किशोरवयीन मुली व बालकांच्या माता मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. नम्रता श्रीराम कोष्टी यांनी केले.

## कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या तीन वेटलिफ्टर्सना रौप्यपदक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**







प्रतिनिधी/पंढरपूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालय, पंढरपूरच्या तीन खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत रौप्यपदक पटकावले.

महाविद्यालयाचा सुरज गायकवाड (११० किलो वजनगट), प्रणव चव्हाण (९५ किलो वजनगट) आणि सत्यजित शिरकर (८५ किलो वजनगट) यांनी आपल्या-आपल्या वजनगटात दमदार कामगिरी करत रौप्यपदकावर नाव कोरले. या तिन्ही खेळाडूंनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एका मानाच्या तुऱ्याची भर पडली आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ. समाधान माने, डॉ. बी. एस. बलवंत, डॉ. राजेश कवडे, डॉ. एस. के. शिंदे, जिमखाना विभागप्रमुख प्रा. अनिल परमार, प्रा. डॉ. उमेश साळुंखे, प्रा. विठ्ठल फुले, प्रा. मनोज खपाले यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या खेळाडूंना महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेला नवी झळाळी मिळाली असून, आगामी स्पर्धांसाठी खेळाडूंमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याच्या केंद्रीय पथकाच्या सूचना

## जिल्हा प्रशासनाचे दुष्काळी उपाययोजनांचे नियोजन उत्कृष्ट; केंद्रीय दुष्काळ पथकाकडून सोलापूर जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, खरीप पिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, चारा नियोजन आणि रोजगार हमी योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आंतरमंत्रालयीन केंद्रीय दुष्काळ पथकाने आढावा घेतला. जिल्हा प्रशासनाने दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी केलेले नियोजन उत्कृष्ट असल्याचे नमूद करत पथकाने पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

केंद्रीय पथकाचे नेतृत्व कृषी व शेतकरी कल्याण विभागाच्या पीक विभागाचे संचालक डॉ. के. पोन्नुसामी करीत आहेत. पथकामध्ये पेयजल व स्वच्छता विभागाचे टीम लीडर अबसार अहमद खान आणि अन्न व सार्वजनिक वितरण विभागाचे सहाय्यक संचालक सुमित शर्मा यांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील खरीप पिकांचे नुकसान, फळपिकांवरील दुष्काळाचा परिणाम, मागील पाच वर्षांतील भूजल पातळी आणि उजनीसह मध्यम व लघुप्रकल्पांतील उपलब्ध पाणीसाठ्याचाही पथकाने आढावा घेतला. दुष्काळी परिस्थितीत विकसित भारत-रोजगार आणि आजीविका मिशन (ग्रामीण) अर्थात व्हीव्हीजी रामजी योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेण्याबाबतही पथकाने सूचित केले. जिल्ह्यातील ११६ गावांना १०८ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती पथकाला देण्यात आली. तसेच जलजीवन मिशनअंतर्गत या गावांतील पाणीपुरवठा योजनांपैकी किती योजना पूर्ण झाल्या आहेत, त्यांची सद्यस्थिती काय आहे आणि पाण्याचे स्रोत कोणते आहेत, याची माहिती पथकाने जाणून घेतली.




कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्व अधिकारी व यंत्रणांनी समर्पित भावनेने आणि संवेदनशीलतेने काम करण्याचे निर्देश दिले. कोविड काळात ज्या तत्परतेने आणि संवेदनशीलतेने प्रशासनाने काम केले, त्याच पद्धतीने दुष्काळी परिस्थितीतही कार्यवाही करावी. पाणी व चारा टंचाईचे काटेकोर नियोजन करताना तातडीच्या उपाययोजनांसोबतच दीर्घकालीन नियोजनावर भर द्यावा. पावसाअभावी पाणीटंचाई तीव्र होऊन नागरिकांचे स्थलांतर होण्याची शक्यता लक्षात घेता, संभाव्य परिस्थितीचा अंदाज घेऊन पूर्वतयारी करावी. दुष्काळी उपाययोजनांच्या अंमलबजावणीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले. पाणीपुरवठा यंत्रणांनी वितरण व्यवस्थेतील गळती रोखावी, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि नागरिकांमध्ये पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत जनजागृती करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची माहिती देताना सांगितले की, जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत सरासरी ४८१.१० मि.मी. पर्जन्यमानाच्या तुलनेत केवळ २४४.७० मि.मी. म्हणजे ५०.९० टक्के पाऊस झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व ११ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील ११० महसूल मंडळांपैकी ९९ मंडळांमध्ये कोरड्या खंडाची नोंद झाली आहे. पीक कापणी प्रयोगांच्या अहवालानुसार सोयाबीनच्या उत्पादकतेत ८७.४ टक्के, मूग ६९.३ टक्के, उडीद ६४.३२ टक्के, बाजरी ५२.२ टक्के आणि मका पिकाच्या उत्पादकतेत ३१.२ टक्के घट नोंदविण्यात आली आहे. जिल्ह्यात पीक नुकसानीचे पंचनामे सुरू असून सुमारे ६२ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. उर्वरित पंचनामेही सरसकट व अचूक पद्धतीने पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीत पाण्याचे काटेकोर नियोजन करण्यावर भर देण्यात येत असून, जिल्ह्याची भूजल पातळी मागील पाच वर्षांच्या तुलनेत २.९८ मीटरने खालावली आहे. उजनी प्रकल्पात ८५.१७ टक्के, सात मध्यम प्रकल्पांत २१.५२ टक्के, ५६ लघुप्रकल्पांत ४.१४ टक्के आणि ९० कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांत २१.८१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. पुढील आठ ते नऊ महिन्यांसाठी पाण्याचे नियोजन महत्त्वाचे असल्याने जलसंधारणाची कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींना पाणी बचतीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. ऑक्टोबर २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या कालावधीसाठीचा टंचाई कृती आराखडा तयार करण्याचे काम प्रगतिपथावर असल्याचे त्यांनी नमूद केले.

**कृषी आयुक्त सूरज मांढरे यांचे संवेदनशीलतेने काम करण्याचे निर्देश; पाणी व चारा नियोजनावर भर**

जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तालुकानिहाय नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून खरीप हंगामात चाऱ्यासाठी दोन कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून, आणखी तीन कोटी रुपये चारा बियाणे खरेदीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांना चारा बियाणे उपलब्ध करून दिल्यास सुमारे दोन लाख १४ हजार मेट्रिक टन चारा उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. तसेच १५ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या साखर कारखान्यांच्या गाळप हंगामामुळे उसाचा चारा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील एकूण पशुधन १८ लाख १७ हजार ६५२ असून उपलब्ध चारा सरासरी ४७ दिवस पुरेल इतका आहे. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना जनावरे कमी किमतीत विकावी लागत असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी पथकाच्या निदर्शनास आणून दिले. एक ते दीड लाख रुपये किमतीने खरेदी केलेली जनावरे २५ ते ३० हजार रुपयांना विकण्याची वेळ आल्याचे शेतकऱ्यांनी सांगितल्याचे त्यांनी नमूद केले.

रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्ह्यातील ४५३ गावांमध्ये ३ हजार २७३ कामे सुरू असून, त्यावर १२ हजार ७१८ मजूर काम करीत आहेत. याशिवाय ४५ हजार १२४ कामे शेल्फवर असून, त्यातून ६४ लाख ८० हजार मनुष्यदिन रोजगार उपलब्ध होण्याचे नियोजन आहे. दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील रोजगाराची गरज लक्षात घेऊन संबंधित कामांना गती देण्यात येणार आहे. तसेच कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधीतून प्रत्येक तालुक्यात दहा याप्रमाणे जिल्ह्यातील १०० तलावांमधील गाळ काढणे आणि तलाव दुरुस्तीची मोहीम राबविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने केंद्रीय पथकाची जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, कृषी उपसंचालक अभिजीत धेडे, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता सुभवेंद्र खांडेकर, धीरज साळी, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर, सर्व उपविभागीय अधिकारी तसेच संबंधित जिल्हास्तरीय विभागप्रमुख उपस्थित होते.

## गौरी गणपती सजावट स्पर्धेतून महिलांच्या कलागुणांना वाव देणे ही सामाजिक कर्तव्य

**दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर : महिलांच्या अंगी असलेल्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास त्यांच्या सर्जनशीलतेला नवी दिशा मिळते. गौरी गणपतीच्या पारंपारिक सणाच्या माध्यमातून महिलांना आपली कला, कल्पकता, संस्कृती सादर करण्याची संधी देणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. असे प्रतिपादन पंढरपूर नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता भगीरथ भालके यांनी केले.

स्वर्गीय लोकनेते आमदार भारत नाना भालके फाउंडेशन च्या वतीने गौरी सजावट स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी नगरसेविका साधना धोत्रे, रुक्मिणी धोत्रे, स्मिता फत्तेपुरकर, सुजाता धुमाळ आदी उपस्थित होते. या स्पर्धेत पारंपारिक आकर्षक मांडणी व सामाजिक संदेश आणि नाविन्यपूर्ण संकल्पना सुरेख संगम पाहायला मिळाला महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याचा हा साठी हा कार्यक्रम राबविण्यात आला.

**पंढरपूरच्या नगराध्यक्ष डॉ. प्रणिताई भालके यांचे प्रतिपादन**

१) सुनिता सुनील नागणे,
२) मोहिनी सागर इंगोले,
३) रंजना सिद्धांत रुपनर, ४) भाग्यश्री संतोष भोईटे, ५) स्मिता अनिल यादव, उत्तेजनार्थ पारितोषक विजेतेसह भेटवस्तू व प्रशिक्षित पत्र देऊन गौरविण्यात आले.

## खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. ग्रामशक्ती वेल्फअर फाउंडेशन, अंबाजोगाई या सामाजिक संस्थेच्या वतीने ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना ५०% टक्के सवलतीच्या दरात सायकलींचे वाटप करण्यात आले. प्रशालेतील एकूण ३८ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला.

या सायकल वाटप कार्यक्रम प्रसंगी ग्रामशक्ती वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष ज्योतिराम सोनके तसेच ज्ञानप्रसार मंडळ, येरमाळाचे प्रशासकीय अधिकारी रमेश मोहेकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक पवार आर. एस. होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कुलदीप घावटे, पत्रकार गोपाल शेळके यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना सायकल उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या शाळेपर्यंतच्या प्रवासाची मोठी सोय होणार असून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळणार आहे. फाउंडेशनच्या या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. सदरील सायकल मिळाल्याने विद्यार्थ्यामधुन आनंद व्यक्त होत आहे.



## आपदग्रस्तांना मदत करणाऱ्यांचा पोलिस प्रशासनाकडून सन्मानचिन्ह देऊन गौरव




**दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : पंढरपूर शहराच्या चहुबाजूने निवडलेल्या सर्व रस्त्यावर रात्री अपरात्री किंवा दिवसा मोठ्या प्रमाणामध्ये वाहतूक वाटते या रस्त्यावर कित्येक वेळा अपघात हे पडतात मला तर असो दिवस असतो यावेळी आभार असताना मच्छी साठी रस्त्यावरील जाणारे येणाऱ्या प्रवासी गाड्या असतील ड्रायव्हर असो किंवा अन्न नागरी असो हे मदतीला धावून येत नाहीत अशावेळी अपघात प्रश्न झालेले जखमी व मृत व्यक्तींना मतीसाठी कोणीही पुढे दशवत नाही अशावेळी सर्वसामान्य जाणारी व्यक्ती या ठिकाणी भोसले चौक मध्ये असलेले माजी नगराध्यक्ष नागेश भोसले यांचे कार्यकर्ते यांना फोन करून सांगतात. प्रमुख ठिकाणी अपघात झाला आहे . रात्र असो किंवा दिवस असो, पाऊस पाणी असो किंवा, योगेश काका भोसले यांची कार्यकर्ते अपघातग्रस्तांना धावून जातात. सर्व मित्र मंडळ अभयार असताना धावून जातात व मदतीचा हात पुढे करतात.

असताना सर्वतोपरी मदत करतात मानवतेच्या कार्याला बोल देण्याच्या उद्देशाने सोलापूर जिल्हा पोलीस प्रमुख अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी साहेब सौ प्रेरणा कटके, पोलीस अधिकारी प्रशांत डगळे साहेब, यांच्या वतीने पंढरपुरातील आपदग्रस्तांना मदत करणाऱ्या सन्मानचिन्ह देऊन पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. येत असते पदाचा हा बोंबल श्री नागेश काका भोसले मित्र मंडळ यांचे कार्यकर्ते विश्वजीत मनापासून कार्यकर्ते यांना प्रदान करण्यात आला पुरस्कार सोहळ्याच्या प्रसंगी शिवसेना शिंदे गटाचे युवा नेते व शिवजी दूर पुन्हा भोसले आपल्या मनोगत मनाली पोलीस पुरस्काराने अपघातग्रस्ताचे जीव वाचवण्यासाठी एक प्रकारे बळ मिळते माजी नगराध्यक्ष नावेच्या एका भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्व कार्यकर्ते आपण असताना तातडीने उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यासाठी व त्यांचे प्राण वाचवण्यासाठी मदत करीत असतो सोलापूर जिल्हा पोलीस प्रशासनाने आम्हाला पुरस्कार देऊन कौतुक केल्याबद्दल आम्ही सर्व त्यांचे आभारी आहोत असे यावेळी शिवसेना शिंदे गटाची युवा नेते विश्वजीत मुन्ना भोसले यांनी सांगितले.

पोलीस पुरस्काराने गौरव करण्यात आल्याबद्दल सर्वत्र नागेश काका भोसले मित्र मंडळची कौतुक व अभिनंदन चा वर्षा होत आहे.

**विद्युत पंप चोऱ्या रोखण्यासाठी ग्रामरक्षक दलाची स्थापना करा, पो.नि.अहिरराव**

## सुंदरपुर परिसरात विद्युत पंपाच्या चोऱ्या काही थांबेना; शेतकरी वर्गात संताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील सुंदर पूर परिसरात शेतकऱ्यांच्या विहिरीवरील व नदीकाठी बसविण्यात आलेल्या विद्युत पंपावर पोलीस प्रशासनास कळवूनही वीज पंपाच्या चोऱ्या मात्र थांबल्या जात नाही यामुळे शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त केला जात असुन शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झाला आहे

> **निफाड पोलीस ठाण्यात पोलिसांची संख्या व कमी असून विद्युत पंप चोऱ्या रोखण्यासाठी गावात ग्रामरक्षक दलाची स्थापना करावी**
>
> **तसेच मिशन मोटर चोरी हातात घेतले असून या आधी झालेल्या मोटार चोरी मधील जे आरोपी पकडलेले असतील त्यांची कसून चौकशी केली जाईल, लवकरात लवकर हे गुन्हेगार पकडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, ग्रामरक्षक दलातील तरुणांनी रात्रीच्या वेळी गस्त घालून मोटार चोरी रोखण्यासाठी सहकार्य करावे**
>
> **– सारिका अहिरराव**
> **पी आय निफाड पोलीस ठाणे**

चोरट्यांनी लक्ष केले असून अनेक दिवसापासून विद्युत पंप चोरीच्या अनेक घटना परिसरात घडल्या आहेत याबाबत

सध्या सर्वत्र पावसाने पाठ फिरविले असून दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे शेतकरी वर्ग अधिक कर्जाचा डोंगर डोक्यावर घेऊन आपले कुटुंब चालवत आहे अशा कठीण प्रसंगात शेतात हातात तोंडाशी आलेला घास वाचविण्यासाठी जीवाचे रान करून पिके वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहेत त्यातच शेतकऱ्यांना मिळणारी वीज वेळी अवेळी येत असून शेताला पाणी देताना रात्रीचा दिवस करावा लागतो त्यातच परिसरात बिबट्याची भीती असतानाही अशा संकटाचा सामना करत असताना आता शेतकऱ्यांपुढे हे विद्युत पंप चोरीचे नवे संकट उभे राहिले आहे

शेतात डोळ्यादेखत पिकांची होणारी दैयनिय अवस्था बघून नवीन विद्युत पंप खरेदी करावे लागत आहे याबाबत निफाड पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली असतानाही विद्युत पंप चोऱ्यांचे सत्र मात्र सुरूच आहे याबाबत नुकतेच पी आय सारिका आहेरराव यांनी भेट देऊन



चोरट्यांचा लवकरात लवकर बंदोबस्त करण्यात येईल असे आश्वासन दिले , यावेळी. परिसरातील शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता

## नळदुर्ग येथिल पँथर चा छावा काळाच्या पडद्याआड; सिद्धांत (सोनू) बनसोडे यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्युज नेटवर्क**



वागदरी (एस.के.गायकवाड): आंबेडकरी चळवळीतील पँथर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब दुशांत बनसोडे रा. नळदुर्ग ता.तुळजापूर यांचे ज्येष्ठ चिरंजीव सिद्धांत बाबासाहेब बनसोडे उर्फ सोनू यांचे दि.०८ऑक्टोबर २२६ रोजी रात्री ठिक १० वा.सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले आहे.

त्यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीतील एक पँथरचा छवा काळाच्या पडद्याआड झाला आहे. ही एक अत्यंत दुर्दैवी आणि दुःखद अशी घटना आहे. सोनू हा नळदुर्ग आणि परिसरातील युवकांचा एक आधारस्तंभ होता.तर नळदुर्ग येथील बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांचे पुतणे होते. त्यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीत कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.बनसोडे कुटंबाचा एक आधारवड कोसळला आहे.त्यांच्या पश्चात आई, वडिल,पत्नी दोन चुलते,चुलत्या भावंडे आत्या असा मोठा परिवार आहे.

दि.०९ आक्टेबर २०२६ रोजी दुपारी ठिक १.०० वा. दरम्यान नळदुर्ग येथे बौद्ध धम्मा पध्दतीने त्यांच्या पार्थिव देहावर अंतिम संस्कार करण्यात आला. सोनू यांच्या दुःखद निधना बदल रिपाइं (आठवले) चे महाराष्ट्र प्रदेश जॉइंट सेक्रेटरी राजा भाऊ ओव्हाळ, मराठवाडा विभाग कार्याध्यक्ष आनंद पांडागळे,जिल्हा अध्यक्ष विद्यानंद बनसोडे, जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब मस्के, भारतिय बौध्द महासभेच्या जिल्हा अध्यक्षा राजश्रीताई कदम सह सर्व पक्षिय कार्यकर्ते, नेते, युवा कार्यकर्ते महिला, सह नगरवासियानी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहीली अंत्यविधी दि.९ ऑक्टोबर २२६ रोजी दुपारी ठिक १.०० वा. दरम्यान नळदुर्ग येथील स्मशानभूमीत करण्यात आला.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन कटिबद्ध



## कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडून राजापूर, बुरलेवाडी येथील दुष्काळसदृश्य परिस्थितीची पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पिकांची स्थिती व उपलब्ध पाणीसाठ्याचा घेतला आढावा; पंचनाम्यांची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश

पंढरपूर (उमाका) : राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगोला तालुक्यातील राजापूर व बुरलेवाडी येथे दुष्काळसदृश्य परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून खरीप पिकांची सद्यस्थिती आणि उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पावसाचे प्रमाण, पिकांची वाढ, पाणी उपलब्धता आणि शेतीच्या नुकसानीबाबत माहिती जाणून घेतली. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

यावेळी कृषिमंत्री भरणे म्हणाले की, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी पीक नुकसानीचे पंचनामे महत्त्वाचे आहेत. त्यामुळे प्रशासनाने शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन पावसातील खंडामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करावे आणि पंचनाम्यांची कार्यवाही निर्धारित वेळेत पूर्ण करावी.

पावसातील खंडामुळे राज्यात सुमारे एक कोटी ४९ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. आतापर्यंत सुमारे एक कोटी हेक्टर क्षेत्रावरील नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे पूर्ण झाले असून, उर्वरित पंचनाम्यांचे काम येत्या चार ते पाच दिवसांत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांसाठी चारा याबाबत नियोजन करून टंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतून नियमानुसार मदत करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सोलापूर जिल्ह्यात सांगोला तालुक्यात पीक नुकसानीच्या पंचनाम्यांचे सुमारे ९५ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. राज्यात केंद्रीय पथकाकडून दुष्काळी परिस्थितीची पाहणी सुरू असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी मदत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे कृषिमंत्री भरणे यांनी सांगितले.

यावेळी शेतकऱ्यांनी पिकांची सद्यस्थिती, पाण्याची उपलब्धता आणि संभाव्य पीक नुकसानीबाबतच्या अडचणी मांडल्या. कृषिमंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांकडून परिस्थितीची माहिती घेतली.

यावेळी आमदार बाबासाहेब देशमुख यांनी सांगोला तालुक्यातील उपलब्ध पाणीसाठा आणि शेतीच्या नुकसानीची वस्तुस्थिती कृषिमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. खरीप पिकांसह इतर पिकांनाही दुष्काळाचा फटका बसल्याचे नमूद करून पंचनामे आणि मदतीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी त्यांनी केली.

या पाहणी दौऱ्यावेळी प्रांताधिकारी अमित माळी, तहसीलदार बाळूताई भागवत, प्रभारी उपविभागीय कृषी अधिकारी दिपाली जाधव यांच्यासह संबंधित अधिकारी, स्थानिक शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

---

# ४० वर्षांपासून वादात अडकलेला लालपाडीतील शेतरस्ता अखेर खुला!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

मौजे लालपाडी ता.निफाड येथील गट क्रमांक २४६ मधून पुढील गटांतील शेतकऱ्यांना वहिवाटीसाठी जाणारा, सुमारे ४० वर्षांपासून वादग्रस्त असलेला आणि न्यायालयीन प्रक्रियेत अडकलेला शेतरस्ता अखेर खुला करण्यात आला आहे.

**प्रत्यक्ष कृती मधून मुख्यमंत्री बळीराजा योजनेची यशस्वी अंमलबजावणी**

तहसीलदार विशाल नायकवडे निफाड यांच्या आदेशानुसार, महसूल प्रशासनाच्या पुढाकारातून ही कार्यवाही करण्यात आली.

या वेळी मंडळ अधिकारी, चांदोरी जयंत लिलके यांनी ग्राम महसूल अधिकारी पूर्वा राठोड, महसूल सेवक शिवाजी बोडके यांच्या सहकार्याने रस्ता खुला करण्यात आला.

रस्ता खुला करण्यापूर्वी संबंधित वादी व प्रतिवादी शेतकऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक चर्चा होऊन समझोता झाला. तसेच रस्ता खुला करण्यासाठी दोन्ही पक्षांनी सहमती दर्शविली.

भूमी अभिलेख विभागाचे उपस्थित अधिकारी बैरागी यांनी रस्त्याची मोजणी करून हद्दीच्या खुणा निश्चित केल्यानंतर. रस्त्यावरील अतिक्रमण दूर करून शेतकऱ्यांच्या वहिवाटीसाठी हा रस्ता प्रत्यक्ष खुला करण्यात आला.

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी यावेळी समाधान व्यक्त केले तसेच या रस्त्याचा लाभ संबंधित वादी शेतकऱ्यांसह पुढील गटांतील इतर शेतकरी, लालपाडी ग्रामस्थ आणि चांदोरी पंचक्रोशीतील नागरिकांनाही होणार आहे.या वेळी

सदर रस्ता खुला झाल्यामुळे मौजे लालपाडी येथील ग्रामस्थ आणि चांदोरी पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी महसूल प्रशासनाचे आभार मानले.

शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी!

वाद नको, संवाद हवा; न्यायालयीन संघर्षापेक्षा परस्पर सहमतीने प्रश्नांची सोडवणूक व्हावी! हा संदेश या प्रसंगी देण्यात आला

---

# उत्कृष्ट गोळीबार कौशल्यात सोलापूर पीआय श्रीनाथ महाडिक प्रथम; इस्त्रायलच्या धर्तीवर मिळाले प्रशिक्षण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : भविष्यातील कोणत्याही आव्हानात्मक परिस्थितीला प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना अधिक सक्षम बनवण्याच्या उद्देशाने राज्यभर विशेष गोळीबार प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे.

याच पार्श्वभूमीवर सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयात झालेल्या विशेष प्रशिक्षणात सहाय्यक पोलीस निरीक्षक (पीआय) श्रीनाथ महाडिक यांना उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार येतोचित सन्मान करण्यात आला.

मुंबईवरील २६/ ११ सारख्या दहशती हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची रणनीती आणि कौशल्य अधिक धारदार करण्यासाठी पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या संकल्पनेतून हा विशेष गोळीबार प्रशिक्षण उपक्रम राज्यपालात हाती घेण्यात आला आहे यात इस्त्राईल मधील कमांडो प्रशिक्षणाच्या धर्तीवर पोलिसांना मूलभूत व आधुनिक गोळीबाराचे धडे दिले जात आहेत.

भारतीय संस्कृती पहा सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयात पार पडलेल्या या कठीण आणि स्पर्धात्मक प्रशिक्षणास १७ दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनाथ महाडिक यांनी आपल्या अचूक निशानेबाजी ची, उत्तम एकाग्रतेची आणि आत्मविश्वास पूर्ण कामगिरीची चुणूक दाखवली या उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर त्यांनी प्रथम क्रमांक मिळवलं सोलापूर पोलीस दलाच्या सिर्फेच्यात एक मानाचा तुरा रोवला.

---

# पुणे शिक्षक, पदवीधर निवडणुकीत प्रचाराचा धुरळा; पाटर्यांच्या चर्चांना उधाण!

प्रतिनिधी/पंढरपूर

बहुरंगी लढतीमुळे राजकीय वातावरण तापले, मतदारांना आकर्षित करण्यासाठी लक्ष्मी दर्शन च्या चर्चाही सुरू

पुणे विभाग शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघात विधान परिषदेची निवडणूक वरचेवर रंगत वाढू लागले आहे. प्रचाराच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. उमेदवारांनी मतदाराच्या प्रत्येक गाठीभेटीवर भर देण्यात आला आहे. स्थानिक नेत्यांना घेऊन प्रचार सभा कॉलर सभा वैयक्तिक संपर्क राबवण्यास सुरुवात केली आहे. पुणे शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघात अनेक उमेदवार उभे राहिल्याने बहुरंगी लढत होण्याची चित्र स्पष्ट होत आहे. त्यामुळे आगामी राजकारणात राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिक्षक व पदवीधर मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध चित्र स्पष्ट होत आहे मतदारांच्या गाठीभेटी सही भोजनाची मेळावे व अनेक आणि इतर कार्यक्रमाचे आयोजन होत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागले आहे. विशेषतः दोन दिवसापासून जेवणावेळी व पार्टीचे नियोजन चर्चा जोर धरू लागली आहे. पण या चर्चांना अधिक दुजोरा मिळालेला नाही.

शिक्षक मतदार संघात अनेक दिगजांची प्रतिष्ठा पणाला,

पुणे शिक्षक मतदार संघातून भाजपकडून कौस्तुभ गावडे, कॉंग्रेसचे विद्यमान आमदार जयवंत आजगावकर, राष्ट्रीय समाज पक्षाकडून माजी आमदार दत्तात्रय सावंत, तसेच डॉक्टर बी. पी. रोंगे आणि शिवसेनेचे मंगेश चिवटे यांच्यासह प्रमुख उमेदवारामुळे लढत रंगतदार होणार आहे.

पदवीधर मतदारसंघात प्रतिष्ठेची लढाई,

पुणे शिक्षण मतदारसंघात भाजपच्या श्रद्धा जाधव, आणि माझी विभागीय आयुक्त प्रभाकर देशमुख यांच्या कन्या हर्षदा देशमुख यांच्यासह प्रभावी उमेदवाराच्या सुरज वाढण्याची शक्यता आहे. मतदारसंघात पोहोचण्यासाठी विविध संपर्क मोहीम राबवली जात आहे. स्थानिक राजकीय नेत्यांची मदत घेतली जात आहे.

पुणे शिक्षक मतदार संघात लक्ष्मी दर्शनाची चर्चा जोर धरू लागली आहे.

प्रचाराचा जोर धरू लागत असताना स्नेहभोजन आणि पार्टीचे आयोजन होत असल्याचे चर्चांना उधाण आले आहे. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात आर्थिक प्रलोभनाची वापर होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात होत आहे. त्यामुळे लक्ष्मी दर्शनाचे चर्चा सुरू झाल्या आहेत.

एकूणच पुणे शिक्षक व पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत प्रचाराचा वेग वाढत असून उमेदवाराची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. मतदार सध्या स्थानिक राजकीय समीकरणाची व संघटनाची भूमिका आणि पहिल्या क्रमांकाची पहिल्या पसंतीचे मताचे गणित हे निर्णय ठरणार आहे. त्यामुळे आगामी काळात प्रचाराचे रणधुमाळी प्रत्यारोप आरोप व बंडखोरी, आणि मतदारांना आकर्षित करण्याच्या प्रयत्नामुळे दोन्ही मतदारसंघातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे.

---

**निफाड येथे पोलिस प्रशासनाच्या वतीने नवरात्रोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक**

**पोलिस अधीक्षक कांतीलाल पाटील**

# नवरात्रोत्सव मंडळांनी सायबर गुन्ह्यांबाबत सतर्क राहावे!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने सर्व नवरात्रोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली.

पोलीस अधीक्षक कांतीलाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सारिका आहेरराव यांनी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. यावेळी 'माझे मंडळ, माझी जबाबदारी' हे ब्रीदवाक्य डोळ्यांसमोर ठेवून उत्सव साजरा करण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

नवरात्रोत्सव काळात भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने





प्रत्येक मंडळाने सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. मंडप परिसर, प्रवेशद्वार आणि गर्दीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून ते सतत कार्यरत ठेवावेत. यामुळे संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यास आणि अनुचित घटना घडल्यास तपासासाठी मदत होऊ शकते.

सध्याच्या डिजिटल युगात सायबर फसवणुकीचे विविध प्रकार समोर येत आहेत. त्यामुळे नागरिकांनी अनोळखी फोन कॉल, संशयास्पद लिंक, बनावट संदेश यांपासून सावध राहावे. कोणालाही ओटीपी, बँक खात्याची माहिती किंवा वैयक्तिक तपशील देऊ नयेत. सायबर गुन्ह्यांबाबत मंडळांच्या माध्यमातून जनजागृती करावी

नवरात्रोत्सव साजरा करताना वाहतुकीस अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी. ध्वनिक्षेपकाच्या नियमांचे पालन करावे, महिला व मुलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे आणि स्वयंसेवकांच्या माध्यमातून गर्दीचे योग्य नियोजन करावे.

सामाजिक सलोखा आणि शांतता कायम ठेवण्यासाठी सर्व मंडळांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे.

'माझे मंडळ, माझी जबाबदारी' या ब्रीदवाक्याला कृतीची जोड देत प्रत्येक मंडळाने सुरक्षा, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक कांतीलाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सारिका आहेरराव यांनी केले.

याप्रसंगी निफाड याप्रसंगी पोलीस कॉन्स्टेबल धनंजय जाधव, अरविंद ढवळे ,नितीन सांगळे, व आदी पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच तालुक्यातील विविध मंडळांचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते